लोकमत

शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत उपक्रम

# मुकुल माधव फाऊंडेशनकडून शाळांमध्ये स्वच्छतागृहे

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** मुकुल माधव फाउण्डेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड हे आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास, पर्यावरण व स्वच्छता या क्षेत्रात भरीव काम करत आहेत. रत्नागिरी परिसरातील शाळांमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबरोबरच शाळांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्या गरजांची पूर्तता करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होऊन मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी शाळांमध्ये स्वच्छतागृह बांधण्याचे काम हाती घेतले आहे.

याआधी रत्नागिरीतील पावस विद्यामंदिर, नेवरे हायस्कूल, कोतवडे हायस्कूल, सरस्वती विद्यामंदिर, गावखडी, महालक्ष्मी विद्यामंदिर, खेडशी, मराठा मंदिर, पाली, जिल्हा परिषद गोळप शाळा अशा आठ ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. आता नाणीज पंचक्रोशी शिक्षण मंडळ, नाणीज व माध्यमिक विद्यालय, धामणसे येथे स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली आहे. याचे उद्घाटन मंगळवारी (दि.२) करण्यात आले. त्याप्रसंगी उद्योजक रवींद्र सामंत, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, संस्थेचे पदाधिकारी, इतर कर्मचारी, मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे पदाधिकारी उपस्थित होते.

शाळेच्या मुख्याध्यापक व संस्थाचालक यांनी मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्थ रितू प्रकाश छाब्रिया यांचे त्यांनी दिलेल्या स्वच्छतागृहाच्या उभारणीसाठी आभार मानले.



**मुकुल माधव फाउण्डेशनतर्फे नाणीज येथील माध्यमिक विद्यामंदिर येथे स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन उद्योजक रवींद्र सामंत तसेच फाऊंडेशनचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाले.**

- मुकुल माधव फाऊंडेनतर्फे विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी हातभार.
- फाऊंडेशनतर्फे शाळांमध्ये स्वच्छता गृहांच्या बांधणीचा उपक्रम हाती.
- रत्नागिरी तालुक्यातील अनेक शाळांना मिळाला लाभ.